**नियमित फौजदारी खटला क्र. ९८/२०२२**

**सरकार — वि— संजय दिवाकर कूकूडकर**

निशाणी क्र. १६

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ हिची शपथेवर साक्ष</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक शपथेवर निवेदन करते की,

माझे नाव — शिला गोविंदा दहीवले,

वय— ४८ वर्षे, धंदा – शेती,

राहणार — चिचाळा, ता. मुल जि. चंद्रपूर.

**<u>सरतपास अभियोग पक्षाकरिता सहा.सरकारी अभियोक्ता कु. जोगे यांच्यामार्फत</u>**

१. आरोपीला मी ओळखते. तो माझ्या माहेरी माझ्या आईच्या घराशेजारी राहतो. घटना अंदाजे दोन वर्षांपुर्वी दाबगाव येथे माझ्या आईच्या घरी घडली. त्यादिवशी माझ्या आईचा आणि आरोपीचा वाद झाला होता. तो माझ्या आईला शिवीगाळ करत होता त्यामुळे मी भांडण सोडवायला मधे पडून आरोपीला समजावले. परंतू तो ऐकत नसल्याने मी रागाच्या भरात त्याच्याविरुध्द पोलीस ठाण्यात रिपोर्ट दिला. असे काही घडले नाही की, त्यादिवशी आरोपीने माझ्या आईला हाता बुक्यांनी मारहाण केली होती व त्या मारहाणीमुळे माझ्या आईच्या टोंगळयाला मार लागला होता.

**साक्षीदार अभियोग पक्षास समर्थन करीत नसल्याने वि.सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांनी त्याला उलट तपासणीच्या स्वरुपातील प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे आहे की, त्यादिवशी आरोपीने माझ्या आईला लाथा बुक्यांनी मारहाण करुन तिच्या टोंगळयालाही मारहाण केली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने तिला मारहाण केल्या मी तिच्याविरुध्द पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला होता. तोंडी रिपोर्ट आता मला दाखविण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. त्यास निशाणी १७ देण्यात येतो. त्यावरुन नोंदविण्यात आलेला प्रथम खबरी अहवाल आता मला दाखविण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर

असून त्यावर माझी सही आहे. त्यास निशाणी १८ देण्यात येतो. रिपोर्ट दिल्यानंतर पोलीस चौकशीला आले होते. आम्ही आईला चंद्रपूर येथील दवाखान्यात उपचारासाठी भरती केले होते. ती तिथे एक महिना भरती होती. तिच्या टोंगळयाची वाटी बाजूला सरकल्यामुळे तिचे ऑपरेशन करण्यात आले होते. आरोपीने तिला ढकलल्यामुळे तिच्या उजव्या पायांच्या टोंगळयाची वाटी सरकली होती. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. नागपूरे यांच्यामार्फत–</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, घटनेबाबत मला अनील गेडाम याने फोनवरुन माहिती दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, घटना घडली त्यावेळी मी तिथे हजर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे घटना कोणामुळे व कशी घडली हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, तोंडी रिपोर्टमध्ये काय लिहिले होते हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनेबाबत मला इतरांकडून समजल्यामुळे मी सरतपासातील मजकूर सांगितला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला घटनेबाबत इतरांनी सांगितल्यामुळे मी पोलीस ठाण्यात रिपोर्ट दिला. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

SAMEER DILIP KAMALAKAR
Digitally signed by SAMEER DILIP KAMALAKAR
Date: 2024.10.09 17:29:34 +0530

(स.दि.कमलाकर)

दिनांक– ०९.१०.२०२४

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र. २, मुल.